# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 09 May 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०९ मे २०२४ दुपारी १.०० वा.**

****

आजपासून नवी दिल्लीत होत असलेल्या सशस्त्र दलांच्या दुसऱ्या परिवर्तन चिंतन संमेलनाचं अध्यक्षस्थान संरक्षण दलप्रमुख अनिल चौहान भूषवत आहेत. लष्कराच्या तीन्ही सशस्त्र दलांसाठीच्या प्रमुखांसाठी हे महत्वपूर्ण संमेलन असून या संमेलनाचा उद्देश नवीन सुधारणात्मक विचारांचा प्रारंभ करणं हा आहे.

****

नवी दिल्लीतल्या डॉक्टर राम मनोहर लोहीया रुग्णालयात गैरव्यवहार करणाऱ्या ११ वैद्यकीय कर्मचाऱ्यांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग सीबीआयनं अटक केली आहे. हे कर्मचारी, वैद्यकीय उपकरणं पुरवठादारांकडून पैसे घेणं, डॉक्टरांची भेट निश्चित करण्यासाठी रुग्णांकडून लाच घेणं तसंच बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र बनवणं असे प्रकार करत असल्याचं तपासात निष्पन्न झाल्यानं ही कारवाई करण्यात आली. सीबीआयनं १५ ठिकाणी छापे टाकून डॉक्टर्स तसंच पुरवठादारांविरुद्ध कारवाई करत १५ जणांविरुद्ध गुन्हे नोंदवले. अलिकडच्या काळात डॉक्टर्स तसंच वैद्यकीय उपकरणं पुरवठादारांविरुद्ध करण्यात आलेली ही दुसरी मोठी कारवाई आहे. गेल्या वर्षी गुन्हे अन्वेषण विभागानं दिल्लीत सफदरजंग रुग्णालयातल्या एका डॉक्टरला यासारख्याच एका गुन्ह्यासाठी अटक केली होती.

****

विमान उड्डाणं रद्द केल्याप्रकरणी नागरी उड्डयन मंत्रालयानं एयर इंडिया एक्सप्रेसला स्पष्टीकरण अहवाल मागितला असून या प्रकरणाचा तातडीनं निपटारा करण्याची सूचना केली आहे. मंत्रालयानं एयर इंडिया एक्सप्रेसला नागरी उड्डयन महानिदेशालयाच्या नियमांनुसार प्रवाशांसाठी आवश्यक त्या सुविधा सुनिश्चित करण्यासही सांगितलं आहे. आजारी असल्याचं कारण देत अनेक वरिष्ठ कर्मचाऱ्यांनी सामुहिक रजा घेतल्यामुळं कालपासून एयर इंडिया एक्सप्रेसची अनेक

उड्डाणं रद्द करण्यात आली तर काही उड्डाणांना आज सकाळपर्यंत उशिरा झाला होता.

****

पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये तणाव वाढत आहे. जीवनावश्यक वस्तुंच्या तुटवड्यासंदर्भात येत्या ११ तारखेला होणारं विरोध प्रदर्शन थांबवण्यासाठी पाकिस्तान प्रशासन पंजाब प्रांतच्या सैनिकांना या भागात तैनात करत असल्यानं हा तणाव वाढत आहे.

यूनाइटेड कश्मीर पीपल्स नॅशनल पक्ष आणि संयुक्त अवामी ॲक्शन कमेटीनं शांततेच्या मार्गानं विरोध प्रदर्शन करणाऱ्यांवर कोणतीही जाचक कारवाई करु नये असं पाकिस्तान प्रशासनाला सूचित केलं आहे. हा विरोध दर्शवणाऱ्या आंदोलकांविरुद्ध बळाचा वापर करण्यात आल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावर विरोध प्रदर्शित करण्याचा इशाराही या दोन पक्षांनी दिला आहे.

दरम्यान, पंजाब प्रांतचे फ्रंटियर कोर, रेंजर्स आणि क्विक रिस्पाँस फोर्सचे जवान या भागात तैनात आहेत.

****

भंडारा जिल्ह्यातल्या मोहाडी तालुक्यात लाच प्रकरणी वैभव जाधव या तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं सापळा रचून अटक केली. वाळू उपसा करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाकडं या तलाठ्यानं २५ हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती ठरलेली २० हजार रुपयांची लाच घेताना तलाठी वैभव जाधव याला सापळ्याची शंका आली आणि त्यानं लाच स्वीकारली नाही. मात्र, त्यानंतर आरोपी वैभव जाधव याला पथकानं ताब्यात घेत मोहाडी पोलिस स्थानकात गुन्हा दाखल केला.

दरम्यान, भंडारा शहरातील मुख्य बाजारपेठेत एका हॉटेलला काल मध्यरात्री आग लागली. अग्निशमन विभागाच्या दोन बंबांद्वारे ही आग आटोक्यात आणली. शॉर्टसर्किटमुळं आग लागल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

****

नागपूर शहर आणि भंडारा जिल्ह्यात अनेक ठिकाणी आज मेघ गर्जनेसह अवकाळी पाऊस झाला. यामुळं रब्बी हंगामातील शेतकऱ्यांनी कापून ठेवलेल्या धान पिकाचं नुकसान झालं आहे.

****

आज नांदेड इथून सुटणारी हुजूर साहिब नांदेड –अमृतसर सचखंड एक्सप्रेस तिच्या नियमितवेळेपेक्षा ११ तास उशीरानं म्हणजेच रात्री साडेआठ वाजता नांदेड रेल्वेस्थानकाहून अमृतसरला रवाना होईल, अशी माहिती दक्षीण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय कार्यालयाच्या वतीनं देण्यात आली आहे.

****

राज्यात काल सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं ४३ पूर्णांक सात दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. आज कोकणात हवामान कोरडं राहणार असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर इथं तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि गारांसह पावसाचा इशाराही हवामान विभागानं दिला आहे.

****